# ६. झडती

(१) कोणत्याही पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी किंवा तपासी अंमलदार यांना त्यांच्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्ह्याशी संबंधित कोणत्याही वस्तुसाठी, कोणत्याही जागेची झडती घेण्याचे अधिकार आहेत.

(२) झडती घेण्यापूर्वी संबंधित पोलीस अधिकारी यांनी त्यांचे ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे. तसेच गणवेषावर त्यांचे नाव व हुद्दा असलेली नामपट्टिका लावणे आवश्यक आहे. झडती घेताना दोन प्रतिष्ठित पंच/साक्षीदार हजर असणे आवश्यक आहे. झडतीचे काम पूर्ण झाल्यावर त्याने झडती पंचनामा तयार करून त्यात जप्त केलेल्या मालाचा तपशील नमूद करून दोन पंच/साक्षीदाराची तसेच त्यावर मालकाची सही घेणे गरजेचे आहे. जप्त केलेल्या वस्तुचा पंचनामा हा जागेवरच तयार करावयास हवा. सदर पंचनाम्याची प्रत ही त्या घरमालक किंवा संबंधित व्यक्तीस देणे आवश्यक आहे.

(३) अंगझडती घेतानाही वरीलप्रमाणे कार्यपद्धती अवलंबिणे आवश्यक आहे. मात्र महिलांची अंगझडती महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी किंवा उपलब्ध महिला नागरिकांमार्फत घेणे आवश्यक आहे.

❑❑

